# प्रेसनोट

दि.११/०४/२०२२

## कोथरूड क्षेत्रीय कार्यालय, म.न.पा. पुणे येथील सहायक आयुक्त, कनिष्ठ अभियंता व शिपायावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | कोथरूड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७,१२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३१ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - सचिन चंद्रकांत तामखेडे, वय - ३४ वर्षे<br>पद - सहायक आयुक्त, वर्ग - २<br>२) अनंत रामभाऊ ठोक, वय ५२ वर्षे, कनिष्ठ अभियंता, वर्ग -३<br>३) दत्तात्रय मुरलीधर किंडरे, वय - ४७ वर्षे, शिपाई, वर्ग - ४<br>सर्व नेमणूक - कोथरूड क्षेत्रीय कार्यालय, पुणे म.न.पा. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- ( पंचवीस हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १५,०००/- (पंधरा हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- दि. ३१/०३/२०२२
सापळा दिनांक :- ११/०४/२०२२.
ठिकाण :- कोथरूड क्षेत्रीय कार्यालय, पुणे म.न.पा.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे कॉन्ट्रॅक्टर असून त्यांनी कोथरूड येथील ड्रेनेज लाईन व कॉंक्रीटीकरणाच्या कामाचे बील मिळणेकरीता लोकसेवक सचिन तामखेडे यांना भेटले असता त्यांनी २५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांनी केलेल्या कामाचे बील मंजूर करून देण्याकरीता लोकसेवक सचिन तामखेडे यानी तडजोडीअंती १५,०००/- रूपये लाचेची मागणी केली. त्या लाच मागणीस लोकसेवक अनंत ठोक यानी सहाय्य केले.

आज रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार हे लोकसेवक सचिन तामखेडे यांना भेटले असता त्यांनी लोकसेवक अनंत ठोक याचेकडे लाच रक्कम देण्यास सांगितले व लोकसेवक ठोक यानी कार्यालयातील शिपाई दत्तात्रय किंडरे याचेकडे देण्यास सांगीतले व किंडरे यानी १५,०००/- रूपयांची लाच रक्कम स्वीकारल्यावर त्या तिघांना ताब्यात घेण्यात आले असून कोथरूड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक भारत साळुंखे हे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.